RNI No. - MAHMAR 2023/84526

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - २ रे ❑ अंक -१८९ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ गुरुवार दि.२२ ऑगस्ट २०२४ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## जनता रस्त्यावर उतरल्यानंतर तुम्हाला जाग येणं खेदजनक

### बदलापूर प्रकरणात हायकोर्टाने सरकारला फटकारलं!

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि२२मुंबई १९**
बदलापूर येथील एका शाळेत दोन लहानग्या मुलींसोबत झालेल्या लैंगिक अत्याचाराच्या घटनेनंतर जनक्षोभ उसळला. नागरिकांनी बदलापूर रेल्वे स्थानकावर रेलरोको आंदोलन केल्यानंतर सरकारी पातळीवर हालचाली झाल्या आणि तपासात विलंब करणाऱ्या पोलीस अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात आली. चिमुरड्यांवर झालेल्या लैंगिक अत्याचार प्रकरणाची मुंबई हायकोर्टानेही गंभीर दखल घेत स्वयंप्रेरणेने याचिका दाखल करून घेतली. या याचिकेवर आज न्या. रेवती मोहिते डेरे व न्या. पृथ्वीराज चव्हाण यांच्या खंडपीठापुढे सुनावणी झाली. या सुनावणीवेळी बदलापूर प्रकरणातील तपासावरून कोर्टाने पोलिसांसह राज्य सरकारला फटकारलं आहे.

सामान्य जनतेनी रस्त्यावर उतरल्यानंतर तुम्हाला जाग येणं हे खेदजनक आहे, अशा शब्दांत हायकोर्टाने राज्य सरकारवर ताशेरे ओढले. तसंच तपास विशेष पथकाकडे देण्याच्या आधी बदलापूर पोलिसांनी काय केलं? त्याची कागदपत्रं कुठे आहेत? पीडित मुलींचं समुपदेशन केलं का?



असे विविध प्रश्न हायकोर्टाकडून राज्य सरकारच्या वकिलांना विचारण्यात आले.

दरम्यान राज्य सरकारच्या वकिलांनी बदलापूर प्रकरणातील तपासाबाबत माहिती देताना कोर्टात सांगितलं की, या प्रकरणातील पहिल्या पीडीत मुलीचं समुपदेशन झालं असून दुसऱ्या पीडितेचं समुपदेशन सुरू आहे. ही घटना १२ आणि १३ ऑगस्ट रोजी झाल्यानंतर पालक १६ ऑगस्ट रोजी पोलीस ठाण्यात आले. याप्रकरणी २१ ऑगस्ट रोजी एसआयटी स्थापन झाली असून तपासाला विलंब करणाऱ्या संबंधित पोलीस ठाण्यातील दोन अधिकाऱ्यांना निलंबित केलेलं. घटना लपवल्याबद्दल शाळेवर कारवाई करणार आहोत, अशी माहिती महाअधिवक्ता वीरेंद्र सराफ यांनी न्यायालयात दिली.

दरम्यान, याप्रकरणी आता मंगळवारी दुपारी पुन्हा सुनावणी होणार असून या सुनावणीत हायकोर्टाकडून नेमके काय निर्देश दिले जातात, हे पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे.

## 'नरेंद्र मोदींचा आत्मविश्वास संपवला...',

### श्रीनगरमधून राहुल गांधींची पंतप्रधनांवर शाब्दिक प्रहार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२जम्मू काश्मीर**
काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे आणि खासदार राहुल गांधी जम्मू-काश्मीर दौऱ्यावर आहेत. आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ते स्थानिक नेत्यांच्या भेटी घेणार आहेत. दरम्यान, आज राहुल गांधी यांनी काँग्रेस कार्यकर्त्यांशी संवाद साधला आणि त्यांना आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महत्वाच्या सूचना केल्या. यावेळी त्यांनी लोकसभा निवडणुकीच्या निकालांचा उल्लेख करत पंतप्रधान नरेंद्र मोदींवर शाब्दिक प्रहार केला.

राहुल गांधी म्हणाले की, 'जेव्हा निवडणुका जाहीर झाल्या, तेव्हा आम्ही सर्वात आधी जम्मू-काश्मीरला जाण्याचे ठरवले होते.



जम्मू-काश्मीरच्या लोकांचे प्रतिनिधित्व सर्वात महत्त्वाचे आहे. स्वातंत्र्यानंतर भारताच्या इतिहासात पहिल्यांदाच एखाद्या राज्याचा दर्जा काढून त्याला केंद्रशासित प्रदेश बनवण्यात आले आहे.'

### पंतप्रधान मोदींचा आत्मविश्वास संपवला

'लोकसभा निवडणुकीदरम्यान इंडिया आघाडीने पंतप्रधान नरेंद्र मोदींचा आत्मविश्वास संपवला. नरेंद्र मोदींचा पराभव राहुल गांधींनी नव्हे, तर काँग्रेस पक्ष, इंडिया आघाडी, प्रेम, एकता आणि आदराच्या विचारसरणीने केला आहे. आपल्याला द्वेषाच्या बाजारात प्रेमाचे दुकान उघडायचे आहे. द्वेषाचा, प्रेमानेच पराभव केला जाऊ शकतो आणि आपण सर्व मिळून द्वेषाचा प्रेमाने पराभव करू, असेही ते यावेळी म्हणाले.

आम्हाला देशातील जनतेला संदेश द्यायचा आहे की, आमच्यासाठी

## राजापेठमध्ये पुन्हा गँगवॉर, खून का बदला खून सें!

### गुन्हेगार तरूणाचे अपहरण करून खून : मृतदेह फेकला नालीत, दोघे अटकेत

**विदर्भ प्रजसत्ताक**
**दि.२२अमरावती २०**
केडिया नगरस्थित उद्यानासमोर गँगवॉरमधून झालेल्या खुनाच्या घटनेची शाई वाळते न वाळतेच पुन्हा एकदा गँगवॉरमधून एका गुन्हेगार तरूणाचे अपहरण करून त्याची निर्घृण हत्या करण्यात आली. बुधवारी रात्री १०.३० च्या सुमारास सातुर्णा ते साईनगर रोडवरील चांडक नाश्टा सेंटर भागात तो खुनी थरार घडला. यश रोडगे (२१, मराठा कॉलनी, गोपालनगर) असे मृताचे नाव आहे. पोलिसांना गुरूवारी पहाटे तीनच्या सुमारास यश रोडगे याचा मृतदेह भातकुली नाका परिसरातील कचरा डेपोच्या रोडच्या बाजुला असलेल्या नालीत आढळून आला. या घटनेने मोठी खळबळ उडाली असून, मृताच्या कुटुंबियांनी राजापेठ पोलीस ठाण्यात धाव घेतली होती.



याप्रकरणी, मृताचा मित्र तथा घटनेत जखमी झालेल्या आकाश रामटेके (२१, गोपालनगर) याच्या तक्रारीवरून राजापेठ पोलिसांनी काटे, श्रेयस आवटे, तक्षदिप इंगळे, मंथन पाडनकर, दिपक ठाकूर व अन्य दोन तीन जणांविरूध्द गुरूवारी पहाटे चारच्या सुमारास खून, खुनाचा प्रयत्न, अपहरण व आर्मक्ट प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला. आरोपींनी यश रोडगेवर तलवार व चाकुने हल्ला करत त्याला दुचाकीवर बसवून शहराबाहेर नेले. त्याचा मृत्यू झाल्याची खात्री झाल्यानंतर बुधवारी उशिरा रात्री त्याचा मृतदेह नालीत फेकून देण्यात आला. तो शोधण्यासाठी राजापेठ पोलीस,गुन्हे शाखा व विशेष पथक चार ते पाच तास कार्यरत होते. अखेर रात्री तीनच्या सुमारास त्याचा मृतदेह आढळून आल्यानंतर गुन्हा दाखल करण्याची व आरोपी अटक करण्याची कार्यवाही करण्यात आली.

### 'लावा'च्या खुनाची पाश्वभूमि

६ सप्टेंबर २०२३ रोजी रात्री गोपालनगर टी पॉईटजवळून अंकुश मेश्राम उर्फ लावा (२२, म्हाडा कॉलनी) याचे अपहरण करून खून करण्यात आला होता. ८ सप्टेंबर रोजी रात्री कोंडेश्वर जंगल भागात लावाचा मृतदेह आढळून आला होता. त्यावेळी राजापेठ पोलिसांनी सनी प्रधान याच्यासह पाच ते सहा अल्पवयीनांविरूध्द खुनाचा गुन्हा दाखल केला होता. लावाच्या खूनात यश रोडगेचा सहभाग असल्याचा आरोप करत बुधवारी रात्री लावाप्रमाणेच यश रोडगेचे अपहरण करण्यात आले. त्याचा मृतदेह शहराबाहेर नेऊन टाकण्यात आला.

## राज्यातील शाळांमध्ये 'सखी सावित्री' समिती कागदोपत्रीच; अडीच वर्षांपासून...

विदर्भ प्रजासत्ताक
**दि.२२अमरावती २२**
राज्यातील शालेय विद्यार्थिनींच्या सुरक्षेचा मुद्दा ऐरणीवर आला. विद्यार्थ्यांच्या सुरक्षेच्या दृष्टीने राज्यातील सर्व शाळांमध्ये 'सखी सावित्री' समिती स्थापन करण्याचा निर्णय शालेय शिक्षण विभागाने घेतला होता. मात्र, शाळा व्यवस्थापनाने त्याकडे कानाडोळा केल्याने अनेक ठिकाणी 'सखी सावित्री' समित्यांचा पत्ताच नाही. काही शाळांमध्ये स्थापन असलेल्या समित्यांचे कार्य केवळ कागदोपत्रीच आहे. अडीच वर्षांपासून निर्णयाची प्रभावी अंमलबजावणी रखडल्याचे चित्र आहे. त्यातच आता शालेय शिक्षण विभागाने आणखी नवीन उपाययोजना लागू करण्याच्या सूचना केल्या आहेत.



बदलापूर येथे चिमुकल्या मुलींच्या अत्याचाराची घटना समोर आल्यानंतर संपूर्ण राज्यातून संताप व्यक्त झाला. अकोला जिल्ह्यात सुद्धा नराधम शिक्षकाने आठवीतील सहा मुलींना अश्लिल चित्रफित दाखवून त्यांचा विनयभंग केला. राज्यात विद्यार्थिनींची सुरक्षा वाऱ्यावर आली. या पार्श्वभूमी शालेय शिक्षण विभागाने अस्तित्वातील उपाययोजनांची प्रभावी अंमलबजावणी व नवीन उपाययोजना लागू करण्यासाठी शासन आदेश निर्गमित केला.

या अगोदर १० मार्च २०२२ रोजी शालेय शिक्षण विभागाने राज्यातील सर्व शाळांमध्ये मुला-मुलींच्या सुरक्षिततेसह निकोप व समतामुलक वातावरण निर्मितीसाठी शाळा, केंद्र व शहर किंवा तालुका स्तरावर समिती स्थापन करण्याचा निर्णय घेतला होता.

मात्र, प्रत्यक्षात त्या समित्या स्थापन करून त्याची प्रभावी अंमलबजावणी झाली नाही. अमरावती मध्ये काही शाळांमध्ये कागदोपत्री समित्यांचे अस्तित्व आहे.

## किमान चार भिंतीच्या आड तरी मुख्यमंत्रिपदाचा चेहरा ठरवा

### उद्धव ठाकरे गटाची भूमिका

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२मुंबई** -ज्याचे जास्त आमदार त्याचा मुख्यमंत्री असे सूत्र ठेवू नका. किमान चार भिंतींच्या आड तरी मुख्यमंत्रिपदाचा चेहरा ठरवा अशी भूमिका उद्धव ठाकरे गटानं घेतली आहे. मुख्यमंत्रिपदाचा चेहरा ठरवला तर पाडापाडीचे राजकारण होणार नाही असं ठाकरे गटाला वाटते. त्यामुळे उद्धव ठाकरेंची ही मागणी काँग्रेस आणि शरद पवार मान्य करणार का हा प्रश्न आहे. महाविकास आघाडीच्या मेळाव्यातही उद्धव ठाकरेंनी जाहिरपणे काँग्रेस-राष्ट्रवादीला आवाहन केले होते. तुम्ही मुख्यमंत्रिपदाचा चेहरा सांगा, मी त्याला पाठिंबा देतो. परंतु निवडणुकीआधी ते जाहीर करावं. ज्याचे जास्त आमदार त्याचा मुख्यमंत्री हे सूत्र वापरले तर पाडापाडी होते ते आपल्याला नको असं उद्धव ठाकरेंनी म्हटलं होते. मात्र ठाकरेंच्या मागणीकडे काँग्रेस आणि शरद पवारांनी दुर्लक्ष केले होते. याआधी युती आणि आघाडीचे राजकारण पाहिले तर ज्याचे जास्त आमदार त्याचा मुख्यमंत्री या सूत्रामुळे पाडापाडीचं राजकारण होते. महाविकास आघाडीत हा धोका आहे त्यामुळे मुख्यमंत्रिपदाचा चेहरा ठरवला तर रणनीती आखता येईल.



## विद्यार्थ्यांच्या आंदोलनाला मोठं यश; आयोगाकडून २५ ऑगस्टची परीक्षा पुढे ढकलण्याचा निर्णय!

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२मुंबई-** महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने अखेर २५ ऑगस्ट रोजी होणारी राज्य सेवा संयुक्त पूर्व परीक्षा पुढे ढकलण्याचा निर्णय घेतला आहे. आबीपीएस परीक्षा आणि एमपीएससीची राज्य सेवा संयुक्त पूर्व परीक्षा एकाच दिवशी ठेवण्यात आल्याने झालेल्या कोंडीमुळे स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांनी मागील दोन दिवसांपासून आंदोलनाचे हत्यार उपसले होते. या आंदोलनाला यश



मिळालं असून आज झालेल्या बैठकीत परीक्षा पुढे ढकलण्याचा निर्णय महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून घेण्यात आला. परीक्षेची नवी तारखी लवकरच जाहीर करण्यात येणार आहे.

आयबीपीएस परीक्षा आणि एमपीएससीकडून दोन परीक्षा एकाच दिवशी ठेवण्यात आल्याने संतप्त विद्यार्थ्यांनी मंगळवारी रात्रीपासून पुणे शहरात आंदोलन करण्यास सुरुवात केली होती. सरकार दरबारी हालचाली सुरू झाल्या आणि राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल आयोगाच्या अध्यक्षांना विद्यार्थ्यांच्या मागण्यांवर तोडगा काढण्याची विनंती केली होती.

## 'लाडक्या बहिणीं'चे खाते सायबर भामट्यांकडून साफ!

**विदर्भ प्रजसत्ताक**
**दि.२२पुणे-** हॅलो, नमस्कार! मी बँकेतून बोलत आहे, तुमच्या खात्यात मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेची रक्कम जमा झाली आहे; पण काही कारणांमुळे ती अडकली आहे. तुम्हाला एक ओटीपी क्रमांक येईल. तो सांगा. म्हणजे योजनेत अडकलेली रक्कम तातडीने मिळेल, असे सांगितले जाते. यावर विश्वास ठेवून महिलाबँक खात्याशी निगडित सर्व माहिती आणि ट्रान्झेक्शनचा ओटीपी देतात अणि तिथेच फसतात. अशाच प्रकारची घटना दोन दिवसांपूर्वी पुण्यात घडली असून, महिलेच्या खात्यातून तब्बल ७० हजार रुपयांची रक्कम चोरट्यांनी काढल्याचे समोर आले आहे. सध्या ही योजना सायबर चोरट्यांच्या रडारवर असून, या योजनेतून

### पुण्यातील महिलेची फसवणूक

फसवणुकीचा नवा फंडा चोरट्यांनी शोधला आहे. राज्यात या योजनेच्या नावाखाली फसवणुकीच्या दिवसाला ८ ते १० तक्रारी येत असल्याचे सायबर तज्ज्ञांकडून सांगण्यात आले आहे.

सध्या राज्यभरातून मुख्यमंत्र्यांनी घोषित केलेल्या लाडकी बहीण योजनेला महिलांचा उदंड प्रतिसाद मिळतो आहे. राखी पौर्णिमेपासून महिलांच्या खात्यात पैसे जमा होण्यास सुरुवात झाली आहे. काही महिला पैसे जमा होण्याच्या प्रतीक्षेत आहेत. नेमकी हीच बाब हेरून सायबर चोरट्यांनी या योजनेलाच लक्ष्य केले आहे. महिलांच्या खात्यात रक्कम जमा झाली आहे; पण काही कारणाने अडकली आहे, अशा भूलथापा



मारत या योजनेसाठी तुम्हाला तुमचे ऑनलाइन बँकिंग लॉगिन करावे लागेल किंवा तुमच्याच मोबाइलमध्ये काहीतरी तांत्रिक बिघाड आहे, असे सांगत, एक प डाउनलोड करण्यास सांगितले जात आहे. सायबर चोरट्यांनी सांगितल्यानुसार महिलांनी कृती केल्यास त्यांच्या खात्यातून रक्कम लंपास केली जात आहे. त्यामुळे या योजनेच्या नावाखाली होणाऱ्या फ्रॉडपासून महिलांनो, सावध राहा, असा इशारा सायबर तज्ज्ञांनी दिला आहे.

संपादकीय ......

## डॉक्टरांना संरक्षण द्या

कोलकाता येथील आर. जी. वैद्यकीय महाविद्यालयात प्रशिक्षणार्थी डॉक्टर तरुणीची नऊ ऑगस्टच्या रात्री बलात्कार करून निर्दयीपणे हत्या करण्यात आली. घटनेने देशभर उसळलेला संताप शांत व्हायला तयार नाही. सरकारी रुग्णालयांतील डॉक्टरांच्या संपामुळे आरोग्य यंत्रणा पार कोलमडली आहे. ही घटनाच तशी अंगावर शहारे आणणारी आणि कोणाच्याही संतापाचा कडेलोट करणारी. ती तरुणी शेवटच्या श्वासापर्यंत आरोपीशी लढत होती. तिच्या शरीरावर १४ पेक्षा अधिक जखमा आढळून आल्या. पूर्ण ताकदीने, शेवटच्या क्षणापर्यंत तिने प्रतिकार केला. जीव वाचवण्यासाठी ती संघर्ष करत राहिली. बलात्कार आणि हत्येच्या या घटनेचे पडसाद देशभर उमटले. आरोपीला कडक शिक्षा सुनावली जावी, असे त्याच्या बहिणीनेही म्हटले असून, रक्षाबंधनाच्या पार्श्वभूमीवर तिने व्यक्त केलेले हे मत महत्त्वाचे आहे. कोलकाता पोलिसांसोबत नागरी स्वयंसेवक म्हणून काम करणार्या या आरोपीला अटक करून, पोलिस कोठडी सुनावली असली, तरी या प्रकरणाचा तपास कोलकाता हायकोर्टाने सीबीआयकडे सोपवण्याचा आदेश दिला आहे. हा खून नसून, ती आत्महत्याही असू शकते, असे वक्तव्य तपासापूर्वीच कोलकात्यातील एका ज्येष्ठ पोलिस अधिकार्यांनी आश्चर्यकारकरीत्या केले होते. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संदीप घोष यांची सीबीआयने चौकशी सुरू केली आहे. त्या घटनेनंतर लगेच महाविद्यालयाशी निगडित असलेल्या इस्पितळाच्या नूतनीकरणाचे काम अचानकपणे सुरू केल्याबद्दल संशय निर्माण झाला आहे. वास्तविक महाविद्यालय परिसरात सुरक्षा पुरवण्याची जबाबदारी प्राचार्यांची होती. ही घटना घडल्यानंतरही घोष यांचे वागणे संशयास्पद होते आणि त्यांचे सत्ताधारी तृणमूल काँग्रेसशी संबंध असल्याचेही उघड झाले. अशा या डॉ. घोष यांना आर. जी. कार महाविद्यालयातून बाजूला करून, 'कोलकाता नॅशनल मेडिकल कॉलेज अँड हॉस्पिटल'चे प्रमुख म्हणून त्यांची नेमणूक केली, यावरूनच त्यांचे आणि सत्ताधार्यांचे संबंध उघड झाले आहेत.

कोलकाता पोलिसांकडे सूत्रे होती, तेव्हा त्यांनी तपासात कार्यक्षमता दाखवली नाही. उलट आता समाजामध्यमांतून खोटी माहिती पसरवल्याबद्दल २८० विद्यार्थी, डॉक्टर, यूट्यूबर्स आणि राजकीय नेत्यांना नोटिसा पाठवून आपण फार मोठी कामगिरी बजावत आहोत, असे चित्र पोलिस निर्माण करत आहेत, ही त्याहून गंभीर बाब. मुळात या घटनेबद्दल प. बंगालमध्ये कमालीचा उद्रेक असून, त्याची ममता बॅनर्जी सरकारला भीती वाटत आहे. घटनेवरून सुरू असलेले राजकारणही उबग आणणारे असून, त्या धगीत मूळ घटनेचाच बळी जातो की काय, अशी स्थिती निर्माण झाली आहे. या प्रकरणातील आरोपीला उघडपणे पाठीशी घालण्याचा प्रयत्नही धक्कादायक म्हणावा लागेल. बंगालमधील सर्वसामान्य माणूस रस्त्यावर उतरला आहे, तो याचा निषेध करण्यासाठी आणि पीडितेला न्याय मिळण्यासाठी. 'आरोपीला वाचवण्याच्या रुग्णालय आणि स्थानिक प्रशासनाच्या भूमिकेमुळे गंभीर प्रश्न निर्माण होतो,' असे लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी म्हटले आहे. तृणमूल हा इंडिया आघाडीतला एक घटक पक्ष असून, काँग्रेससह आघाडीतील अन्य घटक पक्षही अभयाकांडाच्या संदर्भातील तृणमूल सरकारच्या भूमिकेबद्दल समाधानी नाहीत. मुळातच कोणताच राजकीय नेता वा पक्ष या घटनेचे समर्थन करू शकणार नाही.

जम्मू-काश्मीरच्या राजौरी जिल्ह्यातील एका रुग्णालयात महिला डॉक्टरवर रुग्णाने हल्ला केला. गेल्या डिसेंबरमध्ये गुरुग्राममधील खासगी रुग्णालयात एका स्त्री रुग्णावर शस्त्रक्रिया केल्यानंतर, इस्पितळाच्या कर्मचार्याने बेडशिटने तिचे तोंड झाकून लैंगिक अत्याचार केला. थोडक्यात, सार्वजनिक रुग्णालय असो वा खासगी, तेथील महिला डॉक्टर, परिचारिका अथवा रुग्ण, कोणीही सुरक्षित नाही. महाराष्ट्रात केंद्रीय आरोग्य सेवा संरक्षण कायदा तयार करण्याच्या मागणीसाठी निवासी डॉक्टर रस्त्यावर उतरले आहेत. राज्य सरकारकडून त्यांना सकारात्मक प्रतिसाद मिळत असला, तरी केंद्र सरकारकडून दखल घेतली जात नसल्याने आंदोलन तीव्र केले जात आहे. 'मार्ड'च्या आंदोलनाला सर्वसामान्य नागरिकांकडूनही पाठिंबा दिला जात आहे.

# ताण नियोजनाचा नवा कोर्स

विदर्भ प्रजासत्ताक- आधुनिक काळात सर्वांच्या जीवनात सध्या एक समस्या जाणवतेआहे. ती म्हणजेआपल्या मनावर वाढत चाललेला ताण. ताण हा बरेच वेळा नकळत आपल्या मनावर साचत जातो. अगदी ट्रॅफीक मधे अडकल्यावर आपली जी चिडचिड होतेती बाब देखील आपल्या मनावर ताणाची भर घालणारी असते. अश्या विविध प्रसंगांनी आपल्या मनावर ताण साचत जातो. आधुनिक काळातआपल्या जीवनात जटीलता वाढल्यामुळेहेप्रमाण फार जास्त वाढतेआहे. मनावरचा हा ताण हळूहळूआपल्या शरीराला देखील अपाय पोहोचवतो. अश्या प्रकारेताण ही एक मोठी समस्या बनते. तरुण वयामधेमोठ्या प्रमाणात वाढणारेह्रदयरोग व मधुमेहाचे प्रमाण याचे द्योतक आहे. ताण मनावर येणेही एक नैसर्गिक प्रक्रीया आहेव त्यामुळेत्यांस टाळता येत नाही. आपण केवळ त्याचेव्यवस्थापन करु शकतो. दुर्दैवानेआपल्या शालेय किंवा महाविद्यालयीन जीवनामधेताण नियोजनाचेशास्त्रशुद्ध प्रशिक्षण दिलेजात नव्हते. परंतूआता नव्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणांतर्गत विद्यार्थ्यांना वेगवेगळेविषय शिकविलेजाणार आहेत व त्यामधेया ताण नियोजनाच्या नव्या कोर्सचा समावेश केल्या जाऊ शकतो. हा कोर्समहिला महाविद्यालय, अमरावतीचे

प्राचार्यडॉ. अविनाश मोहरील यांनी तयार के ला असून हा कोर्सऑनलाईन स्वरुपात डीप लर्नींग या शैक्षणिक प्लॅटफॉर्मवर उपलब्ध के ला जाणार आहे. डीप लर्नींग हा प्लॅटफॉर्मडॉटकॉम या नामांकित कं पनीकडून राबविला जात असून शैक्षणिक क्षेत्रात अश्या पद्धतीचा प्रयोग अमरावतीच्या कं पनीकडून प्रथमच के ला जात आहे. या कोर्सचा एकू ण कालावधी तीस तासाचा असून यामुळेविद्यार्थ्यांना २ क्रेडीट प्राप्त होणार आहेत. एकू ण २१ व्हीडीयो लेक्चर्स, गृहपाठ, वाचन सामुग्री व परीक्षा असेया कोर्सचे

स्वरुप आहे. महत्वाची गोष्ट म्हणजेहा कोर्ससर्ववयोगटाच्या लोकांकरीता उपलब्ध करण्यात येणार आहे. परीक्षा देऊन प्रमाण पत्र प्राप्त करणाऱ्यांकरीता या कोर्सचेनाममात्र शुल्क द्यावेलागणार आहे. अन्यथा हा कोर्सनिःशुल्क उपलब्ध राहणार आहे.ताण म्हणजेकाय, तो नेमका कसा निर्माण होतो, ताण आलेला ओळखायचा कसा, ताणाच्या वेगवेगळ्या पातळी कोणत्या, कोणत्या पातळीवर कश्या प्रकारेताण नियोजन करायचे, ताण नियोजनाचेविविध टप्पेकोणते, ताण नियोजन करून आपले आयुष्य आनंदी


**डॉ. अविनाश बी. मोहरील**
प्राचार्य,
महिला महाविद्यालय,
अमरावती
मोबाईल: ९४२३१२३९०६ , ९४२३१५४४४५




कसेबनवायचेअश्या विविध गोष्टींबद्दल या कोर्समधेमार्गदर्शन के लेजाणार आहे. लहान व तरुण वयातील मुले मुली ज्यांना प्रचंड राग येतो, जेहुशार असून भांबावलेलेअसतात अश्यांना हा कोर्सउपयोगाचा आहे. मध्यवयीन पुरुष व महिला

ज्या आपल्या कामाच्या ताणामुळेअल्प वयातच आपलेशरीर स्वास्थ्य गमावित आहेत त्यांना मार्गदर्शक असा हा कोर्सआहे. सोबतच एकाकीपणामुळेताण वाढून आयुष्यात दुःखी होणाऱ्या ज्येष्ठ नागरिकांकरीता देखील हा कोर्सआहे. हा कोर्स करण्याच्या सूचना देखील या कोर्सच्या सुरुवातीच्या भागांमधेदेण्यात आलेल्या आहेत. वेगवेगळ्या व्हीडीयो लेक्चरसोबत देण्यात आलेला गृहपाठ ताणमुक्त जीवन जगण्याची तयारी करून घेणारेआहेत. एकुणच सध्याच्या धकाधकीच्या जीवनामधेव

ताण वाढत चाललेल्या स्थितींमधेया कोर्समुळेताणविरहित आनंदी जीवन जगण्याच्या छोट्या छोट्या परंतूअत्यंत परीणामकारक गोष्टी सांगितल्या जाणार आहेत ज्याचा अनेकांना फायदा होणार आहे. या कोर्सचेउद्घाटन दि. २४ ऑगस्ट रोजी होत आहे. त्यानंतर हा कोर्सु.वशशश्रिशरीपळपस.पश या वेबसाईटवर सर्वांकरीता उपलब्ध होणार आहे. डॉ. अविनाश मोहरील हेस्वतः साकोथेरेपी व कौन्सेलींग या विषयात पद्व्युत्तर पदवी प्राप्त समुपदेशक आहेत व त्यांनी या कोर्सच्या माध्यमातून ताण व ताण नियोजन या संदर्भात अत्यंत शास्त्रशुद्ध परंतूसहज समजणाऱ्या शैलीमधेव रंजक पद्धतीनेया हामहत्वाचा विषय हाताळला आहे. हा संपुर्णकोर्समराठी भाषेमधेबनविला असल्यानेसमस्त मराठी भाषिकांना व मराठीचे ज्ञान असणाऱ्यांना सहज समजणारा व आत्मसात करणारा ठरणार आहे.

# तूर पिकातील प्रमुख किडी आणि त्यांचा नुकसानीचा प्रकार

**दि.२२विदर्भ प्रजासत्ताक**

तुर हे प्रमूख डाळवर्गीय पिक आहे. डाळवर्गीय पिकांवर पेरणीपासून पीक निघेपर्यंत जवळजवळ २०० प्रकारच्या किडींचा प्रादुर्भाव आढळून आला आहे. साठवणुकीमध्येही अनेक किडी तुरीवर स्वत:चे पोषण करतात.

विदर्भ प्रजासत्ताक कृषी विशेष

परंतु फुले व शेंगावर होणाऱ्या किडींचे आक्रमण अतिशय नुकसानकारक ठरले आहे. कधी कधी साथीच्या स्वरुपात कीड आल्यास ७० टक्के पेक्षाही अधिक नुकसान शेंगा पोखरणाऱ्या किडीपासून होते. तूर पिकातील प्रमुख किडींची ओळख आणि नुकसानीचा प्रकार कसा ते पाहूया.

**१) शेंगा पोखरणारी अळी/ घाटे अळी**

**ओळख व जीवनक्रम:**



- मादी कोवळी पाने, देठ अथवा कळ्या, फुले तसेच शेंगावर अंडी घालते.
- एक मादी सरासरी ६०० ते ८०० अंडी घालते.
- अंडी अवस्था ३ ते ४ दिवसांची असते. किडी
- अळी ६ अवस्थातून जाते. १८ ते २५ दिवसांनी जमिनीत मातीच्या वेष्टनात अथवा झाडाच्या पालापाचोळयात कोषावस्थेत जातो.
- कोषावस्था ७ ते १४ दिवसांची असते.
- डिसेंबर/जानेवारीत आभाळ ढगाळ असल्यास या किडीचा प्रादुर्भाव वाढतो.

**नुकसानीचा प्रकार:**

- अंडयातून बाहेर निघालेली अळी अगोदर तुरीची कोवळी पाने खाते.




- पिक फुलोऱ्यात आल्यावर कळ्यावर उपजिवीका करते.
- नंतर शेंगा लागल्यावर शेंगांना छिद्र पाडून शरीर बाहेर ठेवून आतील दाणे खाते. त्यामुळे फळधारणेचे प्रमाण कमी होते.
- तसेच मोठ्या अळ्या शेंगाना छिद्रे करुन आतील दाणे पोखरुन खातात.

**२) पिसारी पतंग**

**ओळख व जीवनक्रम:**

- मादी कोवळे देठ, पाने, फुले व लहान शेंगावर रात्रीच्या वेळी अलग अंडी घालते.
- एक मादी साधरणपणे १७ ते १८ अंडी घालते.
- अंडी २ ते ५ दिवसांत ऊबतात.
- अळी १० ते १६ दिवसांनी पूर्ण वाढल्यानंतर शेंगेवर अथवा शेंगेवरील छिद्रात कोषावस्थेत जाते.
- कोषावस्था ४ ते ७ दिवसाची असून ह्या किडीची एक पिढी १७ ते २८ दिवसानी पूर्ण होते.
- ही कीड पावसाळा संपल्यानंतर तुरीवर मोठया प्रमाणात क्रियाशिल असते.

नुकसानीचा प्रकार:

- ह्या अळीचा प्रादुर्भाव साधारणत: पावसाळा संपल्यावर मोठ्या प्रमाणावर होतो.
- अंडयातुन बाहेर पडलेली अळी सुरुवातीला कळ्या, फुले, व शेंगाना छिद्र पाडुन दाणे खाते.
- पुर्ण वाढ झालेली अळी प्रथम शेंगेचा पृष्ठभाग खरवडुन खाते व नंतर बाहेर राहुन आतील दाण्यावर उपजिविका करते.

**३) शेंग माशी**

**ओळख व जीवनक्रम:**

- मादी शेंगाच्या सालीच्या आत अंडी घालते.
- ही अंडी ३ ते ८ दिवसात उबतात.
- अळी अवस्था १० ते १८ दिवसांची असून पूर्ण वाढ झालेली अळी शेंगेतच कोषावस्थेत जाते.
- कोषावस्था ४ ते ९ दिवसांची असते.
- शेंगमाशीचा जीवनक्रम ३ ते ४ आठवड्यात पूर्ण होतो.

**नुकसानीचा प्रकार:**

- सुरुवातीस शेंगमाशीच्या प्रादुर्भावाचे कोणतेही लक्षण शेंगेवर दिसत नाही. परंतु जेव्हा वाढ झालेली अळी कोषावस्थेत जाण्यापूर्वी शेंगेला छिद्र पाडते व त्या छिद्रातुन माशी बाहेर पडते तेव्हा नुकसानीचा प्रकार लक्षात येतो.
- अळी शेंगेत प्रवेश करुन अर्धवट दाणे खाते तसेच दाण्यावर नागमोडी खाचा तयार होतात. यामुळे बुरशीची वाढ होते व दाणे कुजतात.

**४) ठिपक्याची शेंगा पोखरणारी अळी**

**ओळख व जीवनक्रम:**

- कमी कालावधी असणाऱ्या जाती विशेष बळी पडतात.
- फुलोरा येण्याच्या कालावधीमध्ये जास्त आर्द्रता व मध्यम तापमान असते.
- सप्टेंबर, ऑक्टोंबरमध्ये ही अनुकूलता ह्या किडीस मिळाल्याने त्यांची पुनरुत्पादन जलद होते.

नुकसानीचा प्रकार:

- पिक फुलोऱ्यावर आल्यानंतर अळी कळ्या व फुले एकत्र गुंडाळते.




# पोटात जळजळ होऊ नये यासाठी करा हे घरगुती उपाय

दि.२१विदर्भ प्रजसत्ताक

अल्कोहोल, ग्लूटेन पदार्थ, तळलेले पदार्थ, कॅफिन आणि आंबट फळे यांचे सेवन यामुळेही पोटात जळजळ होऊ शकते. हे पदार्थ खाल्ल्याने पोटाचा त्रास होतो. याशिवाय अपचन, सिडिटी किंवा पोटाशी संबंधित इतर कोणत्याही समस्यांमुळेही पोटात जळजळ होऊ शकते. पोटातील ही जळजळ दूर करण्यासाठी काही खाद्यपदार्थ आहेत जे खूप चांगले परिणाम दर्शवतात.




**केळी-** सिडिटी आणि पोटाची जळजळ दूर करण्यासाठी केळी खाऊ शकता. केळी खाल्ल्याने पोटाला त्वरित आराम मिळतो. यामुळे बद्धकोष्ठतेच्या समस्येपासूनही आराम मिळतो, सिडिटी कमी होते आणि पोटात तयार होणाऱ्या सिडिक गॅसेसपासून आराम मिळतो. केळ्यामध्ये आहारातील फायबर देखील असते जे पोटासाठी फायदेशीर असते.

**आलं-** आलं एंटी इफ्लेमेटरी गुणांनी परिपूर्ण आहे. आल्याचे सेवन केल्यानं उलटच्या, आम्लपित्त, मळमळ आणि छातीत जळजळ यापासून आराम मिळतो. आल्याशिवाय चहा तयार करून प्यायल्यास त्याचे फायदे मिळतात. एका कप पाण्यात आल्याचे काही तुकडे टाका आणि पाणी उकळा. हे प्यायल्याने पोटात जळजळ होण्यापासून आराम मिळतो.

**एलोवेरा-**कोरफड फक्त त्वचा किंवा केसांसाठीच नाही तर आरोग्यासाठीही फायदेशीर आहे. हे सेवन करणे देखील खूप सोपे आहे. कोरफडातील रेचक गुणधर्म पोटाची जळजळ कमी करण्यासाठी प्रभावी आहेत. कोरफडीचा रस तयार करून पिऊ शकतो. यासाठी तुम्ही ताजी कोरफड बारीक करून त्यात हलके काळे मीठ आणि मध टाकून प्या.

**दही-** पोटाचा त्रास कमी करण्यासाठी दह्याचे सेवन फायदेशीर ठरते. दह्यामध्ये प्रोबायोटिक्स देखील असतात जे निरोगी आतड्यांतील बॅक्टेरिया वाढवण्याचे काम करतात. याचे सेवन केल्याने पचनसंस्थेला अन्न चांगले पचण्यास मदत होते.

# लाडकी बहीण योजनेंतर्गत मिळणारा निधी बँकांनी कपात करु नये -जिल्हाधिकारी सौरभ कटियार

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२२अमरावती,-** 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना' ही महाराष्ट्र शासनाची अत्यंत महत्त्वाकांक्षी अशी योजना असून या योजनेंतर्गत पात्र लाभार्थ्यांना प्रतिमाह दीड हजार रुपये देण्यात येतात. .जिल्ह्यातील अनेक लाभार्थ्यांच्या खात्यात तीन हजार रुपये जमा झालेले आहेत. आतापर्यंत जिल्ह्यातील लाभार्थ्यांच्या खात्यात जो निधी जमा झालेला आहे तो निधी कोणत्याही बँकेने कपात करु नये, अशी सूचना जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी दिली आहे.

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना ही सध्या राज्यात लोकप्रिय योजना म्हणून परिचित असून या योजनेंतर्गत लाडक्या बहिणीच्या खात्यात राज्यस्तरावरुन प्रतिमाह दीड हजार रुपये याप्रमाणे तीन हजार रुपये जमा झालेले आहेत. त्याचबरोबर यापुढेही या योजनेंतर्गत महिलांच्या खात्यात प्रतिमाह दीड हजार रुपये रक्कम जमा होईल. परंतु असे निदर्शनास आले आहे की, काही बँका महिलांकडे असलेल्या इतर कर्जांची हप्ते या रकमेतून कपात करीत आहेत. अशा तक्रारी जिल्हाधिकारी कार्यालयाला प्राप्त होत आहेत. त्यामुळे कोणत्याही बँकेने लाडकी बहिण योजनेंतर्गत मिळणाऱ्या निधीतून इतर रकमा कपात करुन नये, अशा



प्रकारची कोणतीही तक्रार प्राप्त झाल्यास संबंधित बँकेविरुध्द कार्यवाही करण्यात येईल याची सर्व बँकांनी नोंद घ्यावी.

त्याचबरोबर ज्या लाभार्थ्यांना अद्यापही मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजनेंतर्गत निधी मिळाला नाही त्यांनी आपल्या खाते आधार लिंक करुन घ्यावेत. त्यामुळे लवकरात लवकर त्यांच्या खात्यात निधी जमा होईल. तसेच ज्या पात्र लाभार्थ्यांनी अद्यापही नोंदणी केली नाही त्या लाभार्थ्यांनीही लवकरात लवकर अंगणवाडी सेविकांशी संपर्क करुन आपली नोंदणी करावी. जेणेकरून पात्र लाभार्थ्यांना या योजनेचा लाभ मिळेल, असे आवाहन श्री. कटियार यांनी केले आहे.

RNI No. - MAHMAR 2023/84526
Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

# विदर्भ प्रजासत्ताक

गुरुवार दि. २२ ऑगस्ट २०२४ शहर/ग्रामिण

## कंत्राटदार व उपायुक्त मडावी यांच्यात शाब्दिक वाद

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२अमरावती**

मनपामहापालिकेतील साफसफाई कंत्राटदार व - कंत्राटी मनुष्यबळ पुरवणारे कंत्राटदार यांचा उपायुक्त (प्र.) माधुरी मडावी यांच्यासोबत मंगळवारी शाब्दिक वाद झाला. हा विषय बुधवारीही 'हॉट' चर्चेचा मुद्दा बनला होता. - उपायुक्त माधुरी मडावी यांनी पदभार - स्वीकारल्यापासून स्वच्छतेच्या विषयावर लक्ष केंद्रीत केले. शहरात अनेक ठिकाणी साफसफाई होत नसल्याने त्यांचा रोष स्वाभाविकपणे कंत्राटदारांवर होता. कंत्राटातील अटीशर्थी चुकीच्या असल्याचाही दावा त्यांनी यापूर्वी केला असून, त्यामुळे अनेकदा कंत्राट रद्द करण्याची भाषाही त्यांनी केली आहे; मात्र त्याचवेळी सफाई कंत्राटदारांचे पाच ते सहा महिन्यांचे देयक प्रशासनाकडे



थकीत आहे. त्यामुळे सफाई कामगारांचे वेतन, वाहनांमधील डीझेल, बँकांच्या कर्जाची परतफेड या सर्वांचा ताळमेळ बसवताना आमचीही ओढाताण होत असल्याचा युक्तीवाद कंत्राटदार करीत आहे. त्यावर प्रशासनाकडून समाधानकारक तोडगा निघाला नसल्याने कंत्राटदारांमध्येही नाराजी आहे. त्यातच कंत्राटी कर्मचाऱ्या ही वेतन दोन ते तीन महिन्यांपासून थकीत असल्याने त्यांनी कामगार आयुक्त कार्यालयात भाजपाच्या एका महिला पदाधिकाऱ्याच्या नेतृत्वात आंदोलन उर्वरित केले. त्यानंतर कामगार अधिकाऱ्यांच्या विनंतीनुसार तातडीची बाब म्हणून महापालिका आयुक्त सचिन कलंत्रे यांनी संबंधित कर्मचाऱ्यांचे वेतन अदा करण्याचे निर्देश महापालिकेच्या संबंधित विभागप्रमुखांना दिले, मात्र त्या वेतनाच्या देयकावरही उपायुक्तांनी स्वाक्षरी केली नसल्याचा आरोप कंत्राटदारांनी केला. याच विषयावरून उपायुक्तांच्या दालनात संबंधित कंत्राटदारांची बैठक झाली. त्यामध्ये वेन्ही बाजुने एकमेकांवर - आरोप-प्रत्यारोप झाल्यामुळे काहीसे वातावरण तापले होते. त्यानंतर कंत्राटदार निघून गेल्याने वाद निवळला. तसेच हा प्रकार माहीत झाल्यावर आयुक्तांनीही मध्यस्थी करून संबंधितकंत्राटदारांच्या एका महिन्याच्या वेतनाचा मार्ग मोकळा केला

### घरकुलाच्या नव्या उद्दिष्टांनाही शासनाचा खो



: मार्च झाल्यानंतर लगेच २०२४ २५ वर्षाचे नविन उद्दिष्ट येणे गरजेचे होते. परंतु पाच महीने लोटून सुध्दा मोदी आवास व पंतप्रधान आवास योजनेचे नविन उद्दिष्ट अद्यापही प्राप्त झाले नाही. नाही. मधल्या काळात लोकसभेची आचारसंहीता लागली. मात्र आचारसंहीता संपूर्ण देखील अडीच महीने लोटले आहे. या दरम्यान शासनाकडुन नव्या योजनांची लयलूट सुरू असताना मात्र घरकुलांच्या नव्या उद्दिष्टांना मात्र खो दिला आहे. त्यामुळे घरकुलाच्या प्रतिक्षेत असलेल्या शकडो लाभाऱ्यांना घरकुलाची प्रतीक्षा लागली आहे. निवडणुकीपूर्वी नविन उद्दिष्ट मिळणार का असा प्रश्न आहे.

## महावितरण चा भोंगळ कारभार पुन्हा एकदा चव्हाट्यावर

### लोंबकळलेल्या जिवंत ताराचा स्पर्श झाल्याने बैलजोडी जागीच ठार, वरखेड शिवारातील घटना

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२वरखेड** -तिवसा तालुक्यातील वरखेड या गावात शेतातील कापूस पिकांना डवरे सुरु असताना लोम्बकळलेल्या जिवंत ताराचा स्पर्श बैलजोडी च्या अंगाला झाला आणि बैलजोडी जागीच ठार झाल्याची घटना वरखेड शेत शिवारात बुधवारी दुपारी दोन वाजताच्या सुमारास घडली आहे मात्र सुद्देवाने डवरे वाहत असलेली दोन मजूर माणसं वाचली अन्यथा दोन परिवार उघड्यावर आली असती.महावितरणचा हलगर्जी पणामुळे ही घटना घडली असा बैलजोडी मालकाने आरोप केला आहे.

आपल्या परिवाराचा उदरनिर्वाह करण्यासाठी अनेक भूमिहीन शेतकरी दुसऱ्यांची शेती वाहती करीता घेतात व शेतीत शेत माळ पिकवून आपल्या प्रपंचाचा गाडा चालवितात. तिवसा तालुक्यातील वरखेड येथील सुधाकर अग्रवाल यांचे शेत



वाहती करीता शेतकरी अमोल मधुकर गंधे यांनी घेतले होते.त्यांची मालकीची बैल जोडीने शेती करत होते.वरखेड येथील शेतात मंजुराचे हाताने एक हेक्टर पन्नास आर पीक डवरणी करीत असताना शेतातच लोंबकळत असलेल्या जिवंत विद्युत तारीचा स्पर्श बैलाला होऊन तारे डवरणी च्या जाळ्यात अडकली बैलाची परिस्थिती लक्षात घेता डवऱ्या करीता असलेल्या हेमंत अवसारे व हरिचंद्र उके या शेतकरी मजुराने समय सूचकता पाहून डवरे सोडून बाजूला झाले त्यामुळे त्यांचे प्राण वाचले.मात्र बैलांचा दुर्देवी मृत्यू झाला

बैलजोडी मालकाने लगेच पोलीस स्टेशनला तक्रार केली यावेळी पशुवैधकीय टीम,पोलीस स्टेशन तिवसा व महावितरण ने पाहणी करून पंचनामा केला.यावेळी बैलजोडी मालक व नागरिकांने भरपाई लवकर द्यावी. अशी मागणी केली आहे. अग्रवाल यांच्या शेतातून वीज वाहिनी गेलीली आहे मात्र त्याच्या तारा या जमिनीवर लोंबकळत आहे या बाबत महावितरण कडे तक्रारी सुद्धा करण्यात आल्या होत्या मात्र महावितरण च्या धिकारी व कर्मचाऱ्यांनी या कडे दुर्लक्ष केले परिमाणी दोन मुक्या जनावरांचा दुर्देवी मृत्यू झाला

## वनपालाचे सहकुटूंब उपोषण आईची प्रकृती ढासळली



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२ अमरावती**

वन खात्यातील प्रशासकीय अन्यायाविरुद्ध वनसंरक्षक यांच्या कार्यालयासमोर सहकुटुंब उपोषणास बसलेल्या वनपाल इंद्रजीत बारस्कर यांची आठवडाभरानंतरही प्रशासनाने दखल घेतली नाही. दरम्यान उपोषणामुळे इंद्रजीत यांच्या आईची प्रकृती ढासळली असून त्यांना बुधवारी उपचार घ्यावे लागले.

इंद्रजीत बारस्कर हे वन खात्यामध्ये वनपाल म्हणून कार्यरत आहेत. हरिसाल बीटमधील रोपवनाची पाहणी करताना जानेवारी महिण्यात ते पडले होते. त्यामुले त्यांच्या पायाला गंभीर दुखापत झाली. पुढे शस्त्रक्रिया करुन जुलै २०२४ पर्यंत त्यांना डॉक्टरांनी विश्रांतीचा सल्ला दिला होता. तशी वैद्यकीय कागदपत्रेही त्यांनी सुटीनंतर रुजू होताना वन विभागाकडे सादर केली आहेत. परंतु असे असतानाही अद्याप त्यांचे वेतन रोखले आहे. चिखलदऱ्याच्या गुगामल वन्यजीव विभागाचे उपवनसंरक्षक सुमंत सोळंके हे त्यांच्याशी सुडबुद्धीने वागतात, असा त्यांचा आरोप आहे. यासंदर्भात त्यांनी वेळोवेळी वरिष्ठांकडे माहिती दिली. परंतु त्यांच्या निवेदनाची दखल घेण्यात आली नाही. त्यामुळे गेल्या स्वात्रंत्य दिनापासून त्यांनी वनसंरक्षक कार्यालयापुढे सहकुटुंब उपोषण सुरु केले आहे. या आंदोलनात ते स्वत:, त्यांची आई मालतीबाई , पत्नी विद्या , मुलगी इन्द्रजा व मुलगा शिवबा यांचा समावेश आहे.

### डायरी न दिल्याने रोखला पगार

सन २०१४ च्या जीआरनुसार वन खात्यातील अधिकारी व कर्मचारी या दोघांनाही दैनंदिनी (डायरी) सादर करावी लागते. दरम्यान, दोन महिन्यापेक्षा अधिक कालावधीसाठी डायरी न दिल्यास संबंधितांचे वेतन रोखले जावे, अशी तरतूद आहे. बारस्कर यांनी बऱ्याच काळापर्यंतची डायरी सादर केली नाही. ही बाब वरिष्ठांच्या लक्षात आणून दिल्यानंतर वेतन रोखले . त्यासाठी चौकशी समितीही नेमली होती. दरम्यान वरिष्ठांसमोर आज उशीरा झालेल्या वाटाघाटीअंती त्यांचे वेतन अदा करण्याचा निर्णय झाला आहे.

**- सुमंत सोळंके, उपवनसंरक्षक.**

## बदलापूर घटनेचे अमरावतीत पडसाद, शिवसेना (उबाठा)चे राजकलम, जयस्तंभ चौकात आंदोलन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२अमरावती-**

बदलारपूर येथील शाळकरी मुलींवरील झालेल्या अत्याचाराच्या घटनेचा शिवसेनेच्या वतीने तीव्र निषेध व्यक्त करण्यात आला. या घटनेमुळे देशात मुली व महिलांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाल्याने या विरोधात जयस्तंभसह राजकमल चौक येथे जिल्हाप्रमुख सुनिल खराटे यांच्या नेतृत्वात निदर्शने करण्यात आली. यावेळी शिवसेनेच्या महिला पदाधिकाऱ्यांनी हातात फलके दाखवत 'आम्हाला सुरक्षा द्या' अशी मागणी करत लक्ष




वेधण्याचा प्रयत्न केला.

बदलापूरच्या शाळेत लहान लहान मुलींच्या बाबतीत जो भयानक प्रकार घडला, तो धक्कादायक आणि संताप आणणारा आहे. या निंदनीय घटनेचा राज्यात सर्वत्र तीव्र निषेध होत असताना अमरावतीत देखील घटनेचे पडसाद उमटले आहेत. राजकमल चौक व जयस्तंभ चौकात शिवसेना ठाकरे गटाच्या वतीने या घटनेच्या विरोधात निदर्शने करण्यात आली. यावेळी शासनाविरोधात रोष व्यक्त करीत मुली व महीलांची सुरक्षा करण्याची मागणी देखील रेटण्यात आली. या आंदोलात संपर्क प्रमुख सुधीर सूर्यवंशी, पराग गुडधे, जिल्हा प्रमुख सुनील खराट, सागर देशमुख, कांचन ठाकूर, प्रतिभा बोबशेट्टी, मनीषा टेबरे, लक्ष्मी शर्मा, पिहूषिका मोरे, राजश्री जठाले, जयश्री कुऱ्हेकर, शाम धाने, स्वराज ठाकरे, पंजाब तायवाडे, विकास शेळके, वैशाली विधाते, संदीप इंगोले, प्रशांत ठेंगरे, नितीन तारेकर, वानखडे, पारसे, सागर ढोके यांच्या शेकडो शिवसैनिक सहभागी झाले होते.मुख्यमंत्री, गृहमंत्र्यांनी राजीनामा द्यावा राज्यात दिवसेंदिवस महिला अत्याचाराच्या घटना उघडकीस येत आहे. यावरून राज्यात महिला सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामुळे राज्याचे मुख्यमंत्री तसेच गृहमंत्री यांनी आपल्या पदाचा राजीनामा द्यावा. अशी मागणी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) गटाच्या पदाधिकाऱ्यांनी केली आहे.

## मनपाच्या सर्व शाळांत लवकरच लागणार 'इंटरेक्टिव्ह फ्लॅट पॅनल'

### जिल्हा खनिकर्म प्रतिष्ठान अमरावती मार्फत २० लाखाचा निधी मंजूर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२अमरावती-**

महापालिकेच्या विद्यार्थी विद्यार्थ्यांच्या आ. सुलभा पुरवण्यासाठी २० लाखाचा निधी मंजूर करण्यात आला आहे. त्यापैकी लाखाचा निधी प्रथम टप्यात मिळणार असल्याने आता लवकरच महापालिकेच्या शाळा डिजिटल होणार आहेत.अमरावती कधी बंद होण्याच्या मार्गावर असलेल्या शाळांमध्ये सद्यःस्थितीत पटसंख्या पूर्ण आहे. त्या - किलबिलाटाने गजबजल्या आहेत. यासाठी अमरावतीच्या खोडके यांनी पुढाकार घेतल्याने मनपाच्या शाळांची गुणवत्ता व दर्जा सुधारण्यासह मनपाच्या शाळा - मंडिल शाळा म्हणून नावारूपाला येत आहेत. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या खनिकर्म विभागाच्या जिल्हा खनिज प्रतिष्ठानांतर्गत मनपाच्या शाळांमध्ये इंटरेक्टिव्ह फ्लॅट पॅनल विव्हसॉनिक कंपनीचे साइज ६५ इंच साहित्य पुरविण्यासाठी दोन वर्षांपासून महापालिकांच्या शाळांमध्ये नर्सरी, के.जी १, के.जी. २ व इंग्रजीचा पहिला वर्ग सुरू झाला आहे. तसेच महापालिकेच्या शाळांमध्ये डिजिटल बोर्ड, नवीन डेस्क बेंच लागले असून प्रत्येक शाळांमध्ये वॉटर कुलर व वॉटर प्युरिफायर बसविण्यात आले आहेत. महापालिकांच्या सर्व शाळांचीदुरुस्ती करण्यात आली असून शाळांना उच्च माध्यमिक शाळांची दर्जावाढ करण्यात आली आहे. तसेच मनपाच्या शाळांमध्ये डिजिटलायझेशन, तांत्रि क आधुनिकीकरण व आय. टी. सव्हीलन्स प्रणालीचा पुरवठा करण्यात आला आहे. याच मालिकेत आता इंटरेक्टिव्ह फ्लॅट पॅनल लागणार असल्याने मनपाच्या शाळा डिजिटल साक्षर शिक्षणासाठी सज्ज झाल्या आहेत. या संदर्भात महापालिका प्रशासनाने लवकरात लवकर कारवाई करण्याची सुचना आमदारांद्वारे देण्यात त आली आहे.

## शासनाचे 'वराती मागून घोडे', अत्याचाराच्या घटनेनंतर शाळांनाअस्तित्वातील उपाययोजनांची प्रभावी अंमलबजावणी व नवीन उपाययोजना करण्याच्या सूचना

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२अमरावती-**

बदलापूर येथे चिमुकल्या मुलींच्या अत्याचाराची घटना समोर आल्यानंतर संपूर्ण राज्यातून संताप व्यक्त होत आहे. त्यातच अकोला जिल्ह्यात सुद्धा नराधम शिक्षकाने आठवीतील सहा मुलींना अश्लिल चित्रफित दाखवून त्यांचा विनयभंग केल्याचा धक्कादायक प्रकार घडला. राज्यात विद्यार्थिनींची सुरक्षा वाऱ्यावर आली आहे. या पार्श्वभूमी शालेय शिक्षण विभागाने अस्तित्वातील उपाययोजनांची प्रभावी अंमलबजावणी व नवीन उपाययोजना लागू करण्यासाठी शासन आदेश निर्गमित केला.

शाळांमध्ये सुरक्षितता उपाययोजनांसाठी सीसीटीव्ही बसविण्याचे आदेश देण्यात आले आहेत. खासगी व्यवस्थापनाच्या शाळांना देखील सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याची प्रक्रिया तातडीने करावी लागणार आहे. याची अंमजबजावणी न करणाऱ्या शाळांचे अनुदान रोखणे अथवा मान्यता रद्द करण्याची कारवाई केली जाईल. शासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यासाठी जिल्हा नियोजन समिती योजनेअंतर्गत शिक्षण व



क्रीडा विभागाशी संबंधित योजनांची पुनर्रचना करून ५ टक्के निधी राखीव ठेवण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. शाळांमध्ये शिक्षकेत्तर कर्मचारी नियुक्त करतांना काळजी घेऊन त्यांच्या वर्तवणुकीवर नियंत्रण ठेवण्यासाठी उपाययोजना करणे आवश्यक राहणार आहे. नेमणुकीपूर्वी चारित्र्य पडताळणी अहवाल स्थानिक पोलीस यंत्रणेकडून प्राप्त करून घ्यावा लागेल. शाळांमध्ये मुला-मुलींसाठी सुरक्षित व बालस्नेही वातावरण निर्माण होण्यासाठी 'सखी सावित्री' समितीच्या माध्यमातून प्रयत्न व्हावेत समितीच्या नियमित बैठका घ्याव्यात. समितीचा फलक कार्यालयाच्या दर्शनी भागावर लावावा. लैंगिक गुन्ह्यापासून बालकाचे संरक्षण कायद्यांतर्गत (पोक्सो) राष्ट्रीय बाल अधिकार संरक्षण आयोगाने तयार केलेल्या 'ई बॉक्स' या सुविधेची, तसेच 'चिराग' पची आणि १०९८ हेल्पलाईन क्रमांकाबाबत जागृती करावी आदींसह विविध सूचना देण्यात आल्या आहेत.

### विद्यार्थी सुरक्षा समितीचे गठन

शालेय विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण होतो. विशेषतः लैंगिक छळाबाबतचे अनुचित प्रकार घडतात. या प्रकारांचे समूळ उच्चाटन होणे आवश्यक आहे. त्यासाठी शाळा स्तरावर विद्यार्थी सुरक्षा समितीचे गठन शिक्षणाधिकारी यांच्या स्तरावरुन एक आठवड्यात करावे. अशी समिती वेळोवेळी विद्यार्थ्यांशी चर्चा करुन त्यांच्या समस्या समजावून घेऊ शकेल, असे देखील शासन आदेशात नमूद आहे.

# स्वस्तात गुप्तधनाच्या नावाखाली अमरावतीच्या दांपत्याला ३ लाखांचा गंडा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२नागपूर–** स्वस्तात गुप्तधन देण्याच्या नावाखाली अमरावतीच्या दांपत्याला तीन लाखांचा गंडा घालण्यात आला. गणेशपेठ पोलीस ठाण्याच्या हद्दीत ही घटना घडली.सुरेश गुल्हाने व शुभांगी गुल्हाने (नांदगाव, खंडेश्वर, अमरावती) असे फसवणूक झालेल्या दांपत्याचे नाव आहे. ते नांदगावमध्ये भाजीपाल्याचे दुकान चालवितात. २३ जुलै रोजी रात्री आठ वाजता त्यांच्या दुकानात दोन व्यक्ती आले. ते मजूर होते व त्यांना खोदकामादरम्यान अमरावतीतील राजापेठ येथे सोन्याच्या माळा असलेला हंडा मिळाल्याची त्यांनी बतावणी केली. ठेकेदाराला कळाले तर तो आम्हाला काहीच देणार नाही. ते सोने घरी लग्न असल्याने विकायचे आहे असे सांगुन दोघांनी सोन्याचे दोन मणी सुरेश यांना दिले. त्यांनी त्यांना मोबाईल क्रमांकदेखील दिला. ते सोने त्यांनी पाच ते सात




लाखात देण्याचे कबूल केले. काही दिवसांनी ९११२२८९२३५ या क्रमांकावरून अशोक कराडे नावाच्या व्यक्तीने सुरेश यांना फोन केला व ठेकेदाराने नागपुरला कामासाठी नेल्याचे सांगितले. त्याने लवकरात लवकर सोने घेऊन जाण्याबाबत म्हटले.३० जुलै रोजी गुल्हाने दांपत्य नागपुरात आले व कॉटन मार्केट परिसरात थांबले. तेथे आरोपी आला व त्याने त्यांना उदापुरे ज्वेलर्सच्या बाजुला असलेल्या हनुमान मंदिरात नेले. तेथे आरोपीसह एक महिला व आणखी एक सहकारी होती. त्यांनी लाल कापडात बांधलेले पिवळया धातुचे मणी असलेल्या माळ दाखविल्या. सुरेश यांनी त्यांना ३ लाख रूपये दिले. कॅमेरे लागल्याचे सांगत आरोपींनी त्यांना तेथून लगेच जाण्यास सांगितले. गुल्हाने दांपत्य अमरावतीला परतले व पाच दिवसांनी सोनाराकडे माळ घेऊन गेले. तेव्हा ती बनावट असल्याची बाब समोर आली. गुल्हाने यांच्या पत्नीच्या तक्रारीवरून गणेशपेठ पोलीस ठाण्यात आरोपींविरोधात भारतीय न्याय संहितेच्या कलम ३१६(२), ३१८(४) व ३(५) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपींचा शोध सुरू आहे.–

# उत्सवाच्या काळात डिजे वाजवीण्यावर बंदी घाला

## शेतमजूर युनियनचे जिल्हा ग्रामीण पोलीस अधिक्षकांना निवेदन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२अमरावती**
महाराष्ट्र राज्य शेतमजूर युनियन लालबावटाचे अमरावती जिल्ह्याचे अध्यक्ष दिलीप शापामोहन व जिल्हा कमेटी सदस्या जया मेहरा यांनी नुकतेच अमरावती जिल्हा ग्रामीण पोलीस अधिक्षक मा . विशाल आनंद यांची भेट घेवून निवेदन सादर केल . निवेदना मधून जिल्हा पोलीस अधिक्षकांना विनंती करण्यात आली की गणेश उत्सव , दुर्गा उत्सव तसेच कुठलाही धार्मीक, सामाजीक , राजकीय उत्सवात संपूर्ण अमरावती जिल्हाभर डिजे वाजवीण्यावर बंदी घालावी . कारण डिजेचे प्रचंड आवाजामुळे मोठ्या प्रमाणात ध्वनी प्रदुषण होवून जनतेच्या आरोग्याला धोका संभवतो सोबतच गरीब लोकांचे शिकस्त घरे डिजेचे आवाजामुळे हादरून अपघाताची शक्यता बळावते . अशी एक घटना तिवसा तालुक्यात घडल्याचे कळते . तेंव्हा हृदयविकाराचे रूग्नांचे जिवाला तर डिजे पासून प्रचंड




धोका होतो हे जगजाहीर आहे आणि रात्रीचे वेळेला डिजे सोबत जे लाईट लागले असते त्या लाईटाचे फोकस डोळ्यावर पडतो त्यामुळे डोळ्यातील रेटीनावर घातक परीणाम अनेक ठीकाणी झालेले आहे असे डोळ्यांचे डॉक्टरांनी सांगीतले आहे . अशा या जनतेच्या जिवाशी खेळणारा डीजे याचा बंदोबस्त होण्याची गरज असल्याची चर्चा मा . ग्रामीण पोलीस अधिक्षक विशाल आनंद यांचेशी केलेली असून डिजेला पर्याय म्हणून कोणतेही कमी आवाजातील वाद्यवाजवीण्यास परवानगी द्यावी अशी निवेदनाद्वारे विनंती केली असता साहेबांनी सकारात्मक आश्वासन दिल्याचे कळते . निवेदनावर जिल्हाध्यक्ष दिलीप शापामोहन, सचीव पुंडलीक पापणकर, सुभाष खांडेकर , जया मेहरा , ईत्यादी कार्यकर्ते उपस्थित होते.–

# मविआची शनिवारी ‘महाराष्ट्र बंद’ची हाक, जागावाटप बाजूला ठेवून घेतला निर्णय

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२मुंबई :**
बदलापूरमधील शाळेत दोन चिमुकलींवर झालेल्या अत्याचारप्रकरणी येत्या २४ ऑगस्ट रोजी ‘महाराष्ट्र बंद’ची हाक महाविकास आघाडीने दिली आहे. विधानसभेच्या जागा वाटपाची चर्चा करण्यासाठी महाविकास आघाडीच्या नेत्यांची बुधवारी बैठक आयोजित करण्यात आली होती.या बैठकीत जागा वाटपाचा मुद्दा बाजूला ठेवून बदलापुरातील घटनेवर चर्चा करण्यात आली आणि याविरोधात आवाज उठवण्यासाठी महाराष्ट्र




बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला. या बंदमध्ये मविआमधील सर्व घटक पक्ष सहभागी होणार आहेत. डॉक्टर, वकील, पालक यांनीही बंदमध्ये सहभागी आवाहन मविआच्या नेत्यांनी केले.या बैठकीला काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, विधिमंडळ पक्षाचे नेते बाळासाहेब थोरात, विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार, प्रदेश कार्याध्यक्ष नसीम खान, मुंबई काँग्रेसच्या अध्यक्षा वर्षा गायकवाड, शरद पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, माजी मंत्री अनिल देशमुख, जितेंद्र आव्हाड, उद्धवसेना नेते संजय राऊत, माजी मंत्री अस्लम शेख आदी उपस्थित होते.

### सरकार कोणाला वाचवतंय? : पटोले



लाडकी बहीण म्हणून १५०० रुपये देण्यासाठी मोठमोठे इव्हेंट केले जात आहेत; पण बहिणींची सुरक्षा केली जात नाही. राज्यात सरकार, गृहखाते आहे की नाही, अशी परिस्थिती आहे. बदलापूरच्या घटनेत पोलिसांच्या भूमिकेवरही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. सरकार कोणाला वाचविण्याचा प्रयत्न करत आहे, असे सवाल यावेळी पटोले यांनी उपस्थित केले.

# मंकीपॉक्सच्या पार्श्वभूमीवर आरोग्य विभाग अलर्ट मोडवर

## खबरदारीसाठी मार्गदर्शक सूचना विदेशवारी करणाऱ्यांवर लक्ष

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२अमरावती**
जगातील विविध देशांत मंकीपॉक्स या विषाणूचा संसर्ग वाढत असल्याने जागतिक आरोग्य संघटनेने मंकीपॉक्स आजारास आरोग्य आणीबाणी म्हणून जाहीर केली आहे. यासाठी राज्य शासनाकडून खबरदारीसाठी मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहे. अशात विदेशवारी करणाऱ्या नागरिकांवर आरोग्य विभाग बारीक लक्ष ठेवून असून जिल्ह्यात आरोग्य विभाग अलर्ट झाले आहे.

सध्या जगातील विविध देशांत मंकीपॉक्स या विषाणूचा संसर्ग वाढत असल्याने जागतिक आरोग्य संघटनेने मंकीपॉक्स आजारास आरोग्य आणीबाणी म्हणून जाहीर केली आहे. त्यामुळे जिल्ह्यात आरोग्य विभाग मंकीपॉक्स आजारावर नियंत्रण ठेवण्यासाठी दक्ष असल्याचे जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी सांगितले. आरोग्य विभागाने उपाययोजना करण्यास सुरुवात केली असून गेल्यातीन आठवड्यापासून मंकीपॉक्स



बाधित देशातून प्रवास करून आलेल्या नागरिकांचे आरोग्य विभागामार्फत सर्वेक्षण सुरू करण्यात आले आले आहे.

मंकीपॉक्स आजार हा ऑर्थोपॉक्सया डीएनए प्रकारच्या विषाणूमुळे होतो. काही प्रकारच्या खारी आणि उंदरामध्ये हा विषाणू आढळतो. हे प्राणी या विषाणूचे नैसर्गिक स्रोत आहेत.अंगावर पुरळ उमटण्यापूर्वी १ ते २ दिवसापासून ते त्वचेवरील फोडावरीखपल्या पडेपर्यंत किंवा ते पूर्णपणे मावळेपर्यंत, बाधित रुग्ण अन्य व्यक्तीसाठी संसर्गजन्य असतो. मंकीपॉक्स प्रामुख्याने माणसापासून माणसाला होणारा संसर्ग आहे. शारीरिक संपर्क, शरीरद्रव्य, लैंगिक

संपर्क किंवा जखम याद्वारे या विषाणूच संपर्क होतो. संसर्ग झालेला प्राण चावल्यानेसुद्धा या विषाणूचा संपर्क होतो. त्यामुळे नागरिकांनी आरोग्यार्च काळजी घ्यावी असे आवाहन आरोग्य विभागाच्या वतीने केले आहे.

# मुंबईतील वरळी मतदारसंघातून एनसीपी आमदार अमोल मिटकरी लढवणार निवडणूक? ; बॅनर्स झळकले

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२मुंबई –**
आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सगळ्याच राजकीय पक्षांनी कंबर कसली आहे. इच्छुक उमेदवारही मतदारसंघात प्रचाराला लागले आहेत. लोकसभा निवडणुकीत मिळालेल्या धक्क्यानंतर महायुती सरकारनं विविध योजनांची अंमलबजावणी सुरू केली आहे. त्यात अजित पवारांच्या राष्ट्रवादीनेही जनसन्मान यात्रेच्या माध्यमातून प्रचाराचा शुभारंभ केला आहे. महायुतीत अजित पवारांच्या पक्षाला किती आणि कुठल्या जागा मिळतील हे अद्याप स्पष्ट नाही. त्यातच पक्षातील आमदार अमोल मिटकरी यांचे मुंबईतील बहुचर्चित मतदारसंघात संभाव्य उमेदवार म्हणून बॅनर्स झळकले आहेत.

मुंबईतील वरळी मतदारसंघात अमोल मिटकरी निवडणुकीला उभे राहण्याची शक्यता आहे. त्याबाबत




राष्ट्रवादीच्या पदाधिकाऱ्यांकडून संभाव्य उमेदवार म्हणून बॅनर्स लावण्यात आले आहेत. वरळी विधानसभेवर पुन्हा घड्याळ अशा आशयाचे हा बॅनर आहे. त्यात वरळीतील संभाव्य उमेदवार म्हणून अमोल मिटकरींना शुभेच्छा देण्यात आल्या आहेत. प्रखर वक्तृत्व शासनावर पकड अशी त्यांची ओळख, वरळीकरांची पसंत घड्याळ, सामान्य माणसांची पसंत घड्याळ, हीच ती वेळ पुन्हा घड्याळ घड्याळ कट्टर समर्थक अजितदादा पवार असा मजकूर या बॅनरवर आहे. राष्ट्रवादीचे मुंबई सरचिटणीस नागेश मढवी यांनी हा बॅनर वरळी नाका परिसरात लावलेला आहे.

# एमपीएससी पूर्व परीक्षेचे नियोजन: तारखेत बदल करण्याची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२अमरावती**
आगामी २५ ऑगस्ट रविवार रोजी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने राज्यसेवा पूर्व परीक्षा ठेवलेली आहे. परंतु, याच दिवशी बँकिंग सेवेसाठीची आयबीपीएस तसेच राज्य माहिती आयोगाची यूपीएससी द्वारे घेण्यात येणारी परीक्षा होणार आहे. वरील परीक्षा वर्षातून एकदाच होतात. त्यामुळे एमपीएससी राज्यसेवा



परीक्षा देणाऱ्यांना या परीक्षांना मुकावे लागेल. त्यामुळे तारखेत बदल करून विद्यार्थ्यांना दिलासा द्यावा. अशी मागणी युवक काँग्रेस केली आहे. बुधवारी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले. निवेदनात म्हटले आहे की, या आधीही १८ ऑगस्ट रोजी आयबीपीएस आणि एमपीएससीची समाज कल्याणची परीक्षा एकाच दिवशी आल्याने बऱ्याच विद्यार्थ्यांना परीक्षेला मुकावे लागले होते. त्यामुळे महाराष्ट्रातील परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांच्या हिताचा विचार करता आगामी तीनही परीक्षा एकाच दिवशी होणार नाहीत व राज्यभरातील विद्यार्थ्यांना वंचित राहावे लागणार नाही. या दृष्टीने महाराष्ट्र शासनाने प्रयत्न करावेत. अन्यथा राज्यभर तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही युवक काँग्रेसने जिल्हाधिकाऱ्या मार्फ त मुख्यमंत्र्यांना निवेदनातून दिला आहे. यावेळी वैभव देशमुख, समीर जवंजाळ, गुड्डू हमीद, धनंजय बोबडे, आकाश गेडाम, संकेत साहू, सागर वानखडे, आकाश धुराटकर, शुभम बांबल, अमेय देशमुख, श्रेयस धर्माळे, विठ्ठल मावंदे आदी उपस्थित होते.

# पावसाचा ब्रेक ; सरींऐवजी वाहताहेत घामाच्या धारा

# पारा पोहचला २८ उष्माने नागरिक त्रस्त

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२ अमरावती–** पावसाने काही दिवसांपासून दडी मारली आहे. तापमानात कमालीची वाढ झाली आहे. सध्या तापमानाने ३२ अंशांचा पारा पार केला आहे. पंधरा दिवसांपूर्वी संततधार पावसाने जनजीवन विस्कळीत झाले होते. मात्र, चार दिवसांच्या कालावधीत एकही थेंब पाऊस बरसला नाही. श्रावण महिन्यातील वाढत्या उष्याने नागरिक हैराण झाले आहेत. ऐन श्रावण महिन्यात पाऊस गायब झाल्याने उष्मा वाढला असून, श्रावण महिन्यात पावसाच्या धारांऐवजी घामाच्या धारा वाहात आहेत. ऑगस्टमध्ये पावसाने विश्रांती घेतल्याने काही दिवसांपासून शहराच्या तापमानात वाढ झाली आहे.शहरातील वाढलेले काँक्रीटचे जंगल यामुळे शहराचे तापमान काही वर्षात सातत्याने मोठ्या प्रमाणात वाढत आहे. त्यातच जूनमध्ये दुसऱ्या आणि तिसऱ्या आठवड्यात तसेच जुलैत मोठ्या प्रमाणात पाऊस पडला होता. एवढेच नव्हे तर पूर परिस्थिती निर्माण झाली होती. परंतु, काही दिवसांपासून पाऊस गायब झाल्याने शहरातील

### सर्दी, खोकल्याचा त्रास

पावसाने उघडीप घेतल्याने नागरिकांच्या आरोग्यावर त्याचा परिणाम पडत आहे. पावसाळ्ळ्यात शहरातील विविध रस्त्यांना खड्डे पडले होते. वाहनांच्या वेगाने ती रस्त्यावरून वाळू, सिमेंट हवेत उडत असल्याने नागरिकांच्या आरोग्यावर परिणाम होताना दिसत आहे. नागरिकांना सर्दी आणि खोकल्याचा अधिक त्रास होत आहे.



तापमानात पुन्हा वाढ होत आहे.